# ऋणनिर्देश

''व्यंकटेश माडगूळकरांच्या प्राणिकथांचा अभ्यास'' हा विषय एम्. फिल्. च्या शोध प्रबंधिकेसाठी निवडला. पण त्यासाठी मराठी विभाग (शिवाजी विद्यापीठ) तसेच मार्गदर्शक प्राचार्य डॉ. सयाजीराजे मोकाशी यांच्याशी प्रत्यक्ष चर्चा करुनच विषय निश्चित केला.

व्यंकटेश माडगूळकर हे आमच्या सांगली जिल्यातीलच नामवंत साहित्यिक. विद्यार्थीदशेत त्यांच्या बऱ्याचशा कथा मी वाचलेल्या होत्या. बी. ए. ला ग्रामीण साहित्याचा अभ्यास करत असताना त्यांच्या साहित्याची बरीचशी ओळख झाली. एम. ए. II ला असताना 'कथा या वाङ्.मय प्रकाराच्या अभ्यासामध्ये त्यांचा 'गावाकडच्या गोष्टी' हा कथासंग्रह अभ्यासला. त्यामुळे त्यांच्या कथांची खूपच आवड निर्माण झाली. त्यांचे उपलब्ध होईल ते सर्व साहित्य मी वाचत राहिले. त्यांची सहज, साधी पण मनाला भिडणारी लेखनशैली, ग्रामीण बोलीभाषा वैशिष्टयपूर्ण वाटते. आणि आमच्या परिसरातीलच ते असलेने त्यांच्याबद्दल खूपच आदर वाटतो.

एम्. फिल्. च्या शोधप्रबंधिकेसाठी विषय निश्चित करताना व्यंकटेश माडगूळकरांच्या कथेवरच संशोधन करायचे ठरवले. त्यासंबंधी मार्गदर्शकांशी चर्चा केली. त्या चर्चेतूनच 'व्यंकटेश माडगूळकरांच्या प्राणिकथांचा अभ्यास' हा विषय निश्चित झाला. आणि मलाही हा विषय खूप आवडला. व्यंकटेश माडगूळकरांच्या कथेतील प्राणिकथा हा महत्वपूर्ण, वैशिष्टयपूर्ण असाच भाग आहे. त्यांच्या प्रत्येक कथेमध्ये कोणत्यातरी निमित्ताने प्राणी डोकवताना दिसतो. त्यांनी कथालेखनाचा श्रीगणेशा ज्या कथेने केला ती 'काळया तोंडाची' ही कथा प्राणिजीवनावरीलच आहे. तसेच मानवी जीवनात प्राण्यांचे महत्वपूर्ण स्थान लक्षात घेता त्यांच्या प्राणिकथा सर्वांगसुंदर अशाच वाटतात. मी शेतकरी कुटुंबातीलच असल्याने प्राण्यांविषयी मला बालपणापासूनच कुतुहल वाटत आलेले आहे. तसेच प्राणिकथा हा विषय सर्व अबालवृध्दांच्या आवडीचा विषय असलेला दिसतो. प्राण्यांच्या व्यथा–वेदना, सुख–दुःखे माडगूळकरांनी कथेमधून मांडलेली आहेत. त्यांच्या प्राणिकथा 'प्राण्यांच्या मानसिकतेचा अलंकार लेवून येतात.' त्यामुळे त्या दर्जेदार अशाच आहेत.

हा नाविन्यपूर्ण विषय निवडताना माझे मार्गदर्शक प्राचार्य डॉ. सयाजीराजे मोकाशी यांची खूपच मदत झाली. माझ्या विचारांना दिशा देऊन माझा आत्मविश्वास वाढवला. प्रस्तुत प्रबंधिका विषयाची निवड करण्यापासून ते प्रबंधिका पूर्णत्वास नेईपर्यंत त्यांनी मोलाचे असे सहकार्य केलेले आहे. वेळोवेळी विशिष्ट माहिती सांगून आणि आवश्यक पुस्तके देऊन त्यांनी उत्कृष्ट असे मार्गदर्शन केले आहे. त्यांचे ऋण कधीही न विसरता येण्यासारखे आहे. माझ्या कुटुंबियांनीही मला खूप मदत केली. माझे वडील श्री. प्रल्हादराव दादासो निकम

व आई सौ. रंजना प्रल्हादराव निकम यांची मी फार ऋणी आहे. कारण सतत स्फूर्ती देऊन, प्रबंधिका वेळेत पूर्ण करण्यासाठी त्या दोघांनीही खूप मार्गदर्शन केले. माझे बहिण, भाऊ यांनीही सहकार्य केले या सर्वांचे मी आभार मानते.

एम्. फिल्. ला प्रवेश घेण्यापासून ते प्रबंधिका पूर्णत्वास नेईपर्यंत 'सद्गुरु गाडगे महाराज कॉलेज'चे मराठी विभागप्रमुख प्रा. संभाजीराव देसाई यांनी सहकार्य केले, प्रोत्साहन देऊन मार्गदर्शन केले. मराठी विभागातील प्रा. सौ. शोभना रैनाक, प्रा. सौ. सरलादेवी निकम, प्रा. डॉ. रविंद्र पाटील, प्रा. डॉ. सौ. रेश्मा दिवेकर यांनीही सतत मार्गदर्शन करुन अतिशय मोलाचे सहकार्य केले. तसेच आदरणीय प्राचार्य डॉ. मोहन राजमाने यांचेही सहकार्य मिळाले. या सर्वांच्या सहकार्याबद्दल मी कृतज्ञ राहीन.

माझे पदवी व पदव्युत्तर शिक्षण ज्या कॉलेजमध्ये झाले त्या विटयाच्या 'बळवंत कॉलेज'चे प्राचार्य डॉ. शंकराव कदम यांनीही सतत प्रोत्साहन दिले, मार्गदर्शन केले. तसेच प्रा. व्ही. डी. जाधव सर, प्रा. रेवजे सर यांनीही वेळोवेळी मार्गदर्शन करुन मला प्रोत्साहन दिले. यांच्याही ऋणात मी सदैव राहीन. तसेच LIC च्या विटा शाखेतील विकास अधिकारी श्री. शामराव पाटील यांनीही खूप सहकार्य केले त्यांचेही आभार मानते.

त्याचबरोबर प्रबंधिकेसाठी आवश्यक पुस्तके मिळवून देण्यात अनेकांनी सहकार्य केले. त्यामध्ये 'सद्गुरु गाडगे महाराज कॉलेज', कराड, 'बळवंत कॉलेज', विटा, 'कला वाणिज्य महाविद्यालय' मायणी यामधील ग्रंथालयातील सर्व ग्रंथपाल, सहाय्यक ग्रंथपाल तसेच ग्रंथालय सहकारी यांनी सहकार्य केल्याबद्दल त्यांचीही मी आभारी आहे. तसेच प्रस्तुत प्रबंधिकेची संगणकाद्वारे जुळणी करणाऱ्या व ही प्रबंधिका वेळेत पूर्ण करण्यास मदत करणाऱ्या 'कॉलेज कॉर्नर शॉपी', मायणी चे श्री. सचिन चौधरी यांचीही मी आभारी आहे. त्याचबरोबर बायडिंग करुन देणारे दत्तप्रसाद इंटरप्रायजेसचे श्री. किरण फुलंब्रीकर यांचेही आभार मानते. तसेच मला नेहमी प्रोत्साहन देणाऱ्या, सहकार्य करणाऱ्या ज्ञात–अज्ञातांचीही मी सदैव ऋणी राहीन.

वरील सर्वांच्या सहकार्याबद्दल पुन्हा एकदा कृतज्ञता व्यक्त करुन त्यांचे असेच सहकार्य यापुढेही मिळेल ही आशा बाळगते.

प्राजक्ता निकम